**प्रेसनोट दिनांक १४/०७/२०१९**
**मार्केटयार्ड पोलीस स्टेशन, पुणे शहर**
**पोलीसांकडुन घरामध्ये स्वतःला कोंडुन घेतलेल्या बालकाची सुटका केले बाबत.**

---

दिनांक १३/०७/२०१९ रोजी मार्केटयार्ड पोलीस स्टेशन हद्दिमध्ये बीट मार्शलचे कर्तव्यावर असणारे पो.शि.८९२५ पोटे व पो.शि.१०१४८ धालपे यांना नियंत्रण कक्षाकडुन ०६/३० वा. प्रितम बिल्डिंग दुसरा मजला फ्लॅट नं ४ विद्यासागर कॉलनी मार्केटयार्ड येथे एका मुलाने घरामध्ये स्वतःला कोंडुन घेतले बाबत माहिती मिळाली.नियंत्रण कक्षाचा कॉल मिळताच ०६/३६ तात्काळ बीट मार्शल प्राप्त कॉल लोकेशन येथे गेली.मुलगा वय १४ वर्षे ह्याने आईने कॉम्प्युटर चालु करण्यास नकार दिल्याने रागाच्या भरात मुलाने स्वतःला फ्लॅटमध्ये बंद करुन घेतले. बीट मार्शलने अग्नीशमन दलाच्या मदतीसाठी त्यांना कॉल केला. परंतु ते पोहोचेपर्यत मुलाने स्वतःच्या जिवाचे काही बरेवाईट करुन घेवु नये ह्या भितीने पो.शि. ८९२५ पोटे यांनी तिस-या मजल्यावर राहणारे मुलाचे आजोबा यांच्या फ्लॅट मधुन बाथरुमच्या पाईपच्या सहाय्याने स्वतःच्या जिवाची काळजी न करता दुस-या मजल्यावरील फ्लॅटच्या बालकनी मध्ये पोहोचले व बालकनी मध्ये पडलेल्या लोखंडी जड वस्तुच्या सहाय्याने लोखंडाच्या जाळीचा दरवाजा तोडुन कोंडुन घेतलेल्या सुस्थितीत मुलास बाहेर काढलेट जिवाची पर्वा न करता मुलगा याचा जीव वाचविणा-या पोलीसांचे तेथील स्थानीक रहिवाश्यांनी कौतुक केले.